# मुंबई विद्यापीठ

क्र. आरइजी/आयसीसी/२०२२-२३/५

## परिपत्रक :-

मुंबई विद्यापीठातील सर्व संविधिक पदांवरील संचालक, विभाग प्रमुख, सर्व अधिकारी वर्ग, उपकुलसचिव, सहाय्यक कुलसचिव व समकक्ष अधिकारी यांना सूचित करण्यात येते की, मा. राज्यपाल यांचे कार्यालय (राजभवन), मा. अधिसभा सदस्य, मा. व्यवस्थापन परिषद सदस्य व मा. विद्या परिषद सदस्य यांच्याकडून प्राप्त होणारी पत्रे, विचारण्यात येणारे प्रश्न, एखाद्या विषयाची माहिती किंवा विद्यापीठाशी संबंधित त्यांच्या काही सूचना या संबंधित सर्व संविधिक पदांवरील संचालक, विभाग प्रमुख, सर्व अधिकारी वर्ग, उपकुलसचिव, सहाय्यक कुलसचिव व समकक्ष अधिकारी यांना प्राप्त झाल्यानंतर त्यांना द्यावयाच्या उत्तराचा / माहितीचा मसुदा तयार करून मसुद्यास मा. कुलगुरू, मा. प्र-कुलगुरू आणि कुलसचिव यांची मान्यता घेण्यात यावी व संबंधितास सदर उत्तर देण्यात यावे व त्यांची प्रत माहितीस्तव मा. कुलगुरू, मा. प्र-कुलगुरू आणि कुलसचिव यांना देण्यात यावी.

संबंधित विभागास निवेदनाचे पत्र प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांत उपरोक्त नमूद प्रक्रिया पूर्ण करून संबंधितास उत्तर जाने आवश्यक आहे. सदरबाबत नमूद केलेल्या कालमर्यादेचे काटेकोरपणे सर्वांनी पालन करावे.

दिनांक : २३ मे, २०२२
ठिकाण : मुंबई – ४०० ०३२

(सुधीर पुराणिक)
कुलसचिव

प्रति,

सर्व संविधिक पदांवरील संचालक, विभाग प्रमुख, सर्व अधिकारी वर्ग, उपकुलसचिव, सहाय्यक कुलसचिव व समकक्ष अधिकारी मुंबई विद्यापीठ

प्रत माहितीकरिता

१. स्वीय सहाय्यक (अ) कुलगुरू मुंबई विद्यापीठ, मुंबई – ४०० ०३२
(ब) प्र-कुलगुरू मुंबई विद्यापीठ, मुंबई – ४०० ०३२

Scanned with CamScanner